महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/12 वी/परीक्षा/ 2243
दिनांक : 20/11/2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:-** **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु-मार्च 2024 साठी आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रिलिस्ट, चलन व एक्सेल यादी जमा करणेबाबत तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार आणि तुरळक विषय विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित छायाप्रत विभागीय मंडळास सादर करणेबाबत.....**

**संदर्भ:-** राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा-3/5079 दि.20/11/2023

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु-मार्च 2024 परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी बुधवार दि.05/12/2023 रोजी संबंधित वितरण केंद्रावर वितरण प्रतिनिधीकडे जमा करावयाची आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु-मार्च 2024 परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत आवेदन पत्रासोबत सादर करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. सदर विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती सोबत सादर न केल्यास प्रिलिस्ट स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच **ज्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट मध्ये दुरुस्त्या करावयाच्या आहेत अशा दुरुस्त्या असलेल्या प्रिलिस्टची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली पाने स्वतंत्र पाकिटामध्ये भरुन वितरण केंद्रावर जमा कराव्यात. (पाकिटावर प्रिलिस्ट दुरुस्ती आणि कनिष्ठ महाविद्यालय क्रमांक लिहावा.) दुरुस्त्या असलेल्या प्रिलिस्टची पाने स्वतंत्र पाकिटामध्ये न जमा केल्यास सदर दुरुस्त्या केल्या जाणार नाहीत.**

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**वितरण केंद्र प्रतिनिधींना सुचना:-**

सर्व जिल्हा वितरण केंद्र प्रतिनिधींना कळविण्यात येते की, वरील सूचनेनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रु-मार्च २०२४ परीक्षेकरीता आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापुर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत, प्रिलिस्ट दुरुस्ती पाकिटे संबंधित क.महाविद्यालयाकडून जमा करुन घ्यावेत आणि कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय गठ्ठे करुन घेवून मंडळ कार्यालयात गुरुवार दि.07/12/2023 रोजी संबंधित जिल्हा लिपिकांना देण्यात यावीत. वितरण केंद्रावर स्विकारण्यात आलेले सर्व साहित्य मंडळात दिले आहे याची खात्री करावी. **परीक्षा प्राधान्य असल्यामुळे दिलेल्या मुदतीतच साहित्य जमा करण्यात यावे.**